(ESTD. 1965)
Gondia Education Society's
SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE
Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara
Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301
Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2019-20 Date : 19.10.2019

# मोर महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

गोंदिया शिक्षण संस्था गोंदिया द्वारे संचालीत एस. एन. मोर महाविद्यालय तुमसर येथे दोन दिवसीय ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम व ग्रंथपाल एस. बी. कान्होलकर यांच्या हस्ते फित कापून प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. मसराम यांनी ''अनेक मित्रांचे काम एक ग्रंथ करतो म्हणून ग्रंथांशी मैत्री करा, अभ्यासक्रमाव्यतीरिक्त अवांतर वाचनाची सवय लावावी, वाचाल तर वाचाल'', असे आवाहन केले. प्रा. कान्होलकर सर म्हणाले की, नियमित वाचन केल्यामुळे ज्ञानात वाढ होते. जसे भूक लागल्यावर आपण अन्नाचा शोध घेतो अगदी त्याच प्रकारे एखाद्या विषयाची माहिती पूर्ण मिळविण्यासाठी अनेक पुस्तकांचा शोध घ्यावा आणि आपल्या डोक्याची गरज पूर्ण करावी.

या प्रदर्शनात अनेक उपयुक्त विविध विषयाचे ग्रंथ मांडण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथालय विभाग व स्पर्धा परीक्षा विभाग समन्वयक प्रा. वेरूळकर, प्रा. बेलोकार तसेच लता खंडाईत, संतोष भोयर, संजय आंबाडारे व आनंद मलेवार उपस्थित होते.

